## महत्त्वाचे

### नेहरू युवा केंद्र व नेहरू होस्टेलची पाहणी

औरंगाबाद : युवक विकास व क्रीडा मंत्रालयाने विदेशी पर्यटक व क्रीडा युवकांच्या सुविधेसाठी सुरु केलेल्या नेहरु युवा केंद्र व नेहरु युवा होस्टेलची खा.चंद्रकांत खैरे यांनी रविवारी पाहणी केली. हे केंद्र गैरसोयीचे होत असल्याच्या तक्रारींमुळे जिल्हा समन्वयक व होस्टेल मॅनेजरच्या कामावर पाहणीअंती व्यक्त करण्यात आली. महावीर चौकातील मोक्याच्या ठिकाणी उभारलेल्या केंद्राची दुरवस्था झाल्याने पर्यटक तिकडे येत नाहीत. त्यामुळे केंद्र शासनाने ज्या उद्देशाने हे केंद्र उभारले आहे, त्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचा आरोप करीत खैरेंनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यावेळी उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, माजी नगरसेवक विजय वाघचौरे आदींची उपस्थिती होती.

### अध्यक्षपदी औटे, सचिवपदी कानडे


मधुकर औटे


ताराबाई कानडे

औरंगाबाद : नूतन यशवंत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी मधुकर औटे, सचिवपदी ताराबाई कानडे तर कोषाध्यक्षपदी शिवलाल गाडेकर यांची निवड झाली. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत मधुकर औटे यांच्या पॅनलचा विजय झाला. यामध्ये मधुकर औटे, ताराबाई कानडे यांच्यासह शिवलाल गाडेकर, पद्माकर मांडे, दिलीप पाटील, संतोष साळुंके, संगीता दौड, हेमलता कलूरकर, सोमनाथ मालकर, भारत पेंटेवार हे विजयी झाले.

### मातीच्या गतिरोधकामुळे अपघाताचा धोका

औरंगाबाद : त्रिमूर्ती चौक ते विष्णूनगर रस्त्यावर नुकतेच पाईपलाईनचे काम करण्यात आले; परंतु या कामानंतर रस्त्यावर मातीचे गतिरोधक तयार झाले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका निर्माण होत आहे. माती हटवून रस्ता पूर्ववत करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

### शिवनाथ राठी यांचा सत्कार

औरंगाबाद : महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या कार्यकारिणीच्या सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा नुकताच खा.राजकुमार धूत यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. रवी माछर, बालमुकुंद सोनी, राधेश्याम झंवर, संतोष लखोटिया, जगदीश दरख, गोपाल अजमेरा, दिनेश मालानी, राजेंद्र सोनी, आनंद झंवर आदींची भाषणे झाली व त्यांनी राठी यांना शुभेच्छा दिल्या.

### आयुक्तालयासमोर उपोषण

औरंगाबाद : शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात ६ वर्षांपासून सुरक्षारक्षक पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पूर्वसूचना न देता कामावरुन कमी केल्यामुळे चार कर्मचाऱ्यांनी विभागीय आयुक्तालयासमोर उपोषण सुरु केले आहे. उपोषणाचा सोमवारी ५ वा दिवस असून, प्रशासनाने अद्याप याप्रकरणी कुठलीही दखल घेतलेली नाही. क्रांतिज्योत कामगार संघटनेतर्फे हे उपोषण सुरु आहे. समाधान सपकाळ, संजय लहाने, हरिश्चंद्र हिवराळे, गजानन जाधव हे उपोषणात सहभागी आहेत. किमान वेतन कायद्याप्रमाणे देय असलेली थकीत रक्कम मिळावी, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य कामगार संघटनेची दिशाभूल करीत असून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही व्हावी. कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाबाबत सकारात्मक विचार करावा, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष दीपक थोरात, संदीप सरोदे, दिलीप म्हस्के, सलीम शहा यांनी निवेदनातून केली आहे.

### बसेसमध्ये चालक दुहेरी भूमिकेत

औरंगाबाद : मध्यवर्ती बसस्थानकातून जळगाव विनावाहक बससेवेऐवजी आता 'चालक कम वाहक' अशी बससेवा सुरु करण्यात आली आहे, अशी माहिती स्थानक प्रमुख विजय बोरसे यांनी दिली. त्यामुळे चालक आणि वाहक अशी दुहेरी भूमिका कर्मचाऱ्यांना पार पाडावी लागणार आहे. ही सेवा सुरु करुन नाशिकपाठोपाठ जळगाव विनावाहक बससेवा बंद करण्यात आली आहे. एस. टी. महामंडळाच्या औरंगाबाद विभागाने चार महिन्यांपूर्वी नाशिक, जळगाव व धुळ्यासाठी विनावाहक बससेवा सुरु केली. यासाठी शहरभर प्रचार करण्यात आला. थेट जाणाऱ्या प्रवाशांची यातून सुविधा झाली. परंतु यामुळे 'एसटी'ची टप्पा वाहतूक सेवा बंद करण्याचा प्रयत्न होत असल्याचे म्हणत संघटनांनी विनावाहक बससेवेला विरोध दर्शविला.

**हात टेकले : निलंबनाची कारवाई निव्वळ कागदावर**

# जि.प. शाळेचे नऊ गुरुजी गायब

**औरंगाबाद : गैरसोयीची** बदली झाल्यामुळे गेल्या सात महिन्यांपासून २० गुरुजी जिल्हा परिषदेच्या शाळेत रुजूच झाले नव्हते. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर अर्दड यांनी निलंबनाचे हत्यार उपसताच ७ गुरुजींनी शाळेकडे धाव घेतली, तर सुधारित आदेशान्वये ४ जणांना सोयीच्या शाळा मिळाल्या. तथापि, उर्वरित ९ गुरुजी मात्र अद्यापही शाळेवर गेलेले नाहीत, ना शिक्षण विभागाच्या संपर्कात आहेत.


एकीकडे ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक नसल्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायतींचे सरपंच, जिल्हा परिषद शिक्षण समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शाळांना शिक्षक द्या म्हणत शिक्षणाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवले आहेत. अनेकदा पालकांनी चिमुकल्यांची शाळा जिल्हा परिषदेतच भरवली. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्दड यांनी शिक्षणाधिकारी आर. एस. मोगल यांच्याकडून शिक्षकांचा आढावा घेतला. तेव्हा मे महिन्यात बदली प्रक्रिया राबविण्यात आली.

त्यावेळी प्रशासकीय बदल्यांमध्ये सोयीची शाळा मिळाली नाही म्हणून काही शिक्षक शाळा बदलून मागत आहेत. यासंबंधीचे अर्जही त्यांनी शिक्षण विभागाकडे केले असल्याची माहिती दिली. त्यामुळे 'सीईओ' अर्दड यांनी मनमानीपणे गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांना नोटिसा बजावून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई का करण्यात येऊ नये, यासंबंधी तात्काळ खुलासा मागवून घ्या, असे आदेश दिले.

'सीईओं'च्या आदेशानुसार शिक्षणाधिकाऱ्यांनी २० शिक्षकांच्या निलंबनाची फाईल सामान्य प्रशासन विभागात सादर केली. दरम्यान, यापैकी ३ शिक्षकांनी विभागीय आयुक्तांकडे अन्यायकारक बदलीबाबत अर्ज केले होते. त्या तिघांच्या बदलीत सुधारणा करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी दिल्यानंतर शिक्षणाधिकारी कार्यालयाने त्यांच्या बदलीत सुधारणा केली. उर्वरित एका शिक्षकाची चुकीची बदली झाल्याचे 'सीईओ' यांच्या निदर्शनास आल्यामुळे त्याही शिक्षकाच्या बदलीमध्ये सुधारणा करण्यात आली.

**'सीईओं'च्या आदेशाची प्रतीक्षा**

◆ यासंदर्भात शिक्षणाधिकारी आर. एस. मोगल यांनी सांगितले की, विनापरवाना गैरहजर असलेल्या शिक्षकांविरुद्ध निलंबनाची कारवाई करावी, या आशयाचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागात सादर केलेला आहे. सदरील शिक्षकांवर 'सीईओं'च्या आदेशानंतरच निलंबनाची कारवाई होईल.





निलंबनाच्या भीतीपोटी ७ जणांनी नियमित शाळेत जाणे सुरु केले. मात्र, आजपर्यंत ९ शिक्षक मात्र, बदली झालेल्या शाळेतही रुजू झाले नाहीत किंवा शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या संपर्कातही नाहीत. दुसरीकडे, निलंबनाची फाईल मात्र सामान्य प्रशासन विभागातच पडून आहे.

## वाणिज्य वार्ता


नारायणा इन्स्टिट्यूटच्या वतीने आयोजित चर्चासत्राला उपस्थित विद्यार्थी व पालक. मार्गदर्शन करताना डॉ.एम.एफ.मल्लिक.

### नारायणाच्या चर्चासत्राला प्रतिसाद

**औरंगाबाद : शहरातील** आघाडीची शैक्षणिक संस्था नारायणा इन्स्टिट्यूटच्या वतीने ७ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित चर्चासत्राला चांगला प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांसोबत पालकांनीही पुढील स्पर्धा परीक्षा, प्रवेश परीक्षांची माहिती जाणून घेतली.

सिडकोतील संत तुकाराम नाट्यगृह विद्यार्थी व पालकांनी भरुन गेले होते. नारायणाचे संचालक डॉ.एम.एफ.मल्लिक यांनी सांगितले की, आजच्या युगात विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अनेक सोयीसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. दर्जेदार शिक्षणामुळे गुणवत्ता वाढल्याने आज प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा अटीतटीची झाली आहे. ज्या क्षेत्रात अनेक विद्यार्थी प्रयत्नशील आहेत. येथे कार्यतत्परतेने यश मिळते बाकी सर्व त्यास सहायक ठरतात.

स्वत:हून प्रयत्नशीलतेसोबतच कार्यतत्परता अंगी बाळगणे गरजेचे आहे, असे मार्गदर्शन त्यांनी केले. दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता ५ फेब्रुवारी रोजी तर इयत्ता ७ वी, ८ वी व ९ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता फाऊंडेशन बॅचसाठी प्रवेश परीक्षा २२ जानेवारी रोजी घेण्यात येणार अशी माहिती प्रा. विशाल लदनिया यांनी दिली. यावेळी प्रा.संतोष कालुंगे, प्रा. दुर्गेश सिंग, प्रा.गोधन सिंग, प्रा. अब्दुल हन्नान, प्रा. सुनील झा, प्रा. प्रदीप शुक्ला आदींची उपस्थिती होती.

### सद्भावना पदयात्रेचे अरिहंतनगरात आगमन

**औरंगाबाद :** संस्कृती, सुरक्षा,सद्भावना पदयात्रेचे अरिहंतनगरात रविवारी आगमन झाले.

आचार्य गुप्तीनंदीजी गुरुदेव, मुनिश्री सुयशगुप्तीजी, मुनिश्री चंद्रगुप्तजी, आर्यिका सुनिधीमती माताजी, आर्यिका सुनितीमती माताजी, क्षुल्लक धर्मगुप्तजी यांची पदयात्रा जेव्हा अरिहंतनगरात पोहोचली तेव्हा सकल जैन समाजाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. येथील आदिनाथ दिगंबर जैन मंदिरात आचार्य गुप्तीनंदीजी गुरुदेव ससंघाचे वास्तव्य ३ डिसेंबरपर्यंत राहणार आहे. या दरम्यान दररोज सकाळी ७.३० वाजता भगवंतांचा पंचामृत अभिषेक, प्रवचन, सामाईक प्रतिक्रमण, सायंकाळी आनंदयात्रा आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या धार्मिक कार्यक्रमांचा समाजबांधवांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अरिहंतनगर जैन मंदिराचे अध्यक्ष महावीर ठोले यांनी केले आहे. धार्मिक कार्यक्रम यशस्वीतेसाठी अनिल कासलीवाल, महावीर पाटणी, पी. डी. गंगवाल, लालचंद ठोले, सुनील काला, शांतीलाल सेठी, सुभाष पांडे, नितीन गंगवाल, रितेश पहाडे, संजय काला आदी परिश्रम घेत आहेत.

# हैं तय्यार हम...

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME

**मी धावणार माझ्यासाठी**



मॅरेथॉन म्हणजे दीर्घ पल्ल्याची, सहनशक्ती व शारीरिक कसोटी पणाला लावणारी शर्यत. यासाठी संयम, एकाग्रता व स्वत:च्या क्षमतेचा संतुलित वापर करुन ध्येय प्राप्ती करणाराच ही शर्यत पार करु शकतो व जिंकू शकतो. 'लोकमत'तर्फे प्रायोजित औरंगाबाद मॅरेथॉनला क्रेडाई औरंगाबादतर्फे हार्दिक शुभेच्छा.

-सुनील पाटील, अध्यक्ष, क्रेडाई.



**क्रेडाई ग्रुप...** (डावीकडून) अखिल खन्ना, रवी वट्टमवार, विजय शम्करवार, सुनील बेदमुथा, पापालाल गोयल, संग्राम पठारे, प्रकाश मालखरे, अनिल मुनोत, सुनील पाटील, विकास चौधरी, गोपेश यादव, अनिल अग्रहारकर, जितेंद्र मुथा, भास्कर चौधरी, आशुतोष नावंदर.



**वंश बिल्डकॉन...** (डावीकडून) श्रीराम काथार, सतीश रगडे, संतोष राजकर, कैलास राजपूत, धीरज पासी, सुधाकर औटे, कविता शर्मा, अंकुश पवार, राजू शेख, अंगद जगदाळे, राजू गोवर्धन, मनोज जोशी, देवीदास म्हस्के.


**औरंगाबाद इंडस्ट्रीयल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन...** (डावीकडून) गजानन जलवार, अशोक बोठे, विनोद चौधरी, विजय शर्मा, रवींद्र करवंदे, कल्याण वाघमारे, मोहंमद शोएब.



**असोसिएशन ऑफ सिव्हिल इंजिनिअर्स (प्रॅक्टिसिंग)...** (डावीकडून) राज वकील, धीरज मुंदडा, प्रशांत अवसरमल, गोपाल भूतडा. महेश राजपूत, प्रा. राहुल अग्रवाल, नीरज देशपांडे, धनंजय गिरधर, शैलेश सूर्यवंशी, अजय खेमनार (अध्यक्ष), नामदेव कारखाने, प्रमोद सावंत, रवींद्र तोंडे, मुजीब पठाण, राजन डागा.

Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION | ERA INTERNATIONAL SCHOOL

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (i) pvt.ltd | Partners: रवि मसाले, blueumbrella

**नाव नोंदणी व सहभागासाठी**

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

# जालना रोडवर डॉक्टराला लुटले

**औरंगाबाद : जालना** रोडने विमानतळाकडे निघालेल्या डॉक्टरांची कार अडवून एका गुंडाने त्यांना धमकावत दीड हजार रुपये लुटले. रविवारी रात्री सव्वासातच्या सुमारास अत्यंत वर्दळीच्या शिवशक्ती कॉलनीजवळ ही लूट करण्यात आली.

झांबड इस्टेटमधील रहिवासी डॉ. ललित जैन यांची आत्याबहीण दिल्लीहून विमानाने येणार होती. त्यांना आणण्यासाठी डॉ. जैन हे रविवारी रात्री ७.१५ वाजेच्या सुमारास कारने चिकलठाणा विमानतळाकडे जात होते. त्यांच्या कारच्या खिडकीची काच उघडी होती. आकाशवाणी सिग्नल ओलांडून ते पुढे निघाल्यानंतर एका दुचाकीस्वाराने त्यांना हात दाखवला आणि, 'ओळखलं का' असे विचारले. डॉक्टरांनी उत्तर देण्यापूर्वीच त्याने मला तुमच्याशी बोलायचे आहे, असे सांगून गाडी बाजूला उभी करण्याचे सांगितले. धडधाकट शरीरयष्टी असलेला हा दुचाकीस्वार पोलीस असावा, या उद्देशाने त्यांनी त्यांची कार एसएफएससमोरील शिवशक्ती कॉलनीजवळ उभी केली. दुचाकीस्वाराने कारमागे त्याची मोटारसायकल उभी केली आणि तो कारमध्ये येऊन बसला. तो म्हणाला, आम्ही आताच एका नगरसेवकाला बेदम ठोकले असून त्यास ५८ टाके पडले आहे. माझी माणसे मागून तलवारी आणि चाकू घेऊन येत आहेत.

माझ्याजवळही गुप्ती आहे, असे धमकावत तुमच्याजवळ जेवढे पैसे असेल तेवढे काढा अशी धमकी त्याने डॉक्टरांना दिली. डॉक्टरांनी त्याला हजार रुपयांची नोट दिली. गुंडाने जैन यांच्या खिशातून चारशे ते पाचशे रुपये काढून घेतले आणि तो कारमूधन उतरला. आरोपी हा सराईत गुन्हेगार असावा, असे त्याच्या बोलण्यावरुन वाटत असल्याने जैन घाबरले होते. तो कारमधून उतरताच जैन पुढे निघाले तेव्हा त्यांना पीसीआर मोबाईल दिसली. त्यांनी पोलिसांना थांबवून या घटनेची माहिती दिली.

### बनावट कार्ड; आरोपींना कोठडी

**औरंगाबाद : जालना** नगर परिषद निवडणुकीच्या पूर्वसंध्येला बनावट मतदार ओळखपत्र तयार करणाऱ्या दोन जणांना गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शनिवारी रात्री धाड मारून पकडले. या आरोपींना रविवारी न्यायालयाने ३० नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी ठोठावली आहे.

रईस शेख अब्दुल रहेमान आणि सय्यद सिकंदर (रा. रहेमानिया कॉलनी) अशी आरोपींची नावे आहेत. याविषयी अधिक माहिती देताना पोलीस निरीक्षक श्यामसुंदर वासुरकर यांनी सांगितले की, आरोपींविरोधात जिन्सी ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तांड्यांवरील पाणीपुरवठा खोळंबला

**डीपी देण्यास अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष : १५ दिवसांपासून शेतकरी त्रस्त**

**औरंगाबाद : बिघाड** झालेले रोहित्र (डीपी) दुरुस्तीसाठी महावितरणकडे पाठविले; परंतु १५ दिवसांपासून अधिकारी ग्रामस्थांना उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने तांड्यांवरील पाणीपुरवठा खोळंबला आहे.

लालूनाईक तांडा, तोलानाईक तांडा, एकोड तांडा, सोमानाईक तांडा येथील शेतकरी व नागरिकांना अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. अनेकदा नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. आज-उद्या असे सतत उत्तरे देण्यात येत आहे. सध्या विहिरीत पाणी असून देखील विजेअभावी पिकांना पाणी देणे शक्य नाही.

एवढेच नव्हे तर तांड्यावरील सार्वजनिक पाणीपुरवठ्याच्या विहिरीवरील मोटारही बंद असल्याने नागरिकांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. चिंचोली, परदरी असा मोठा भार डीपीवर असल्याने विजेचा बिघाड सतत होत आहे.

**शेतकरी अडचणीत...**



विद्युत डीपीवर जास्तीचा भार येत असल्याने अनेकदा विद्युत खंडित होण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्याचा परिणाम शेतकरी व ग्रामस्थांनाही सहन करावा लागत आहे. अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन अधिक क्षमतेची डीपी बसवून सुरळीत वीज पुरवठा सुरु ठेवावा. अन्यथा त्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने रमेश पवार यांनी दिला आहे.

**'न्यायपत्र' स्मरणिकेचे प्रकाशन : प्रख्यात दलित साहित्यिक 'उपरा'कार लक्ष्मण माने यांचे मत**

# समाज जीवनात संविधानातील समतेचा अभाव

**औरंगाबाद : भारतरत्न** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानातील समता, विचार स्वातंत्र्य वास्तवात दिसून येत नाही. संविधानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आहे. मात्र, ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतच. 'सीबीएसई', 'आयसीएसई' सारख्या इंग्रजी शाळांमध्ये भरमसाट शुल्क भरल्याशिवाय प्रवेश नाही. संविधानामध्ये दिन, दलितांच्या उत्थानाचा आग्रह धरण्यात आला आहे; पण प्रत्यक्ष जीवनात दलितांना जागोजागी नाडण्याचाच प्रयत्न होत आहे, अशी खंत 'उपरा'कार लक्ष्मण माने यांनी व्यक्त केली.

अनुसूचित जाती, जमाती व बौद्ध आयुर्विमा कर्मचारी कल्याण संघटनेच्या वतीने 'न्यायपत्र' या स्मरणिकेच्या प्रकाशन समारंभात लक्ष्मण माने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माने पुढे म्हणाले की, अलीकडच्या काळात खाजगीकरणामुळे आरक्षणाचा लाभही मागासवर्गीयांना मिळत नाही. संसदेला विश्वासात न घेता नोटाबंदीसारखे पाऊल उचलून देशात आणीबाणीसदृश स्थिती निर्माण केली जात आहे. देशाची संसद व संविधान नाकारण्याचाच हा प्रकार नव्हे काय, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. स्मरणिकेचे संपादक भीमराव सरवदे यांनी स्मरणिकेचा उद्देश स्पष्ट केला. वाचन व लेखन संस्कृती आज लोप पावत चालली आहे. सामाजिक विषयावर चिंतन करणारा वर्ग हळूहळू कमी होत असून, समाजातील वैचारिक भूकदेखील मंदावत चालली आहे. परिणामी, चळवळीचा भविष्यकाळ हा फार चांगला असेल असे वाटत नाही. दलित साहित्याने ज्या वेगाने वैचारिक संस्कृती उंचावली, तेवढ्याच वेगाने ती आज रसातळाला जाताना दिसते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात संघटनेचे अध्यक्ष अशोक कुशेर म्हणाले की, चळवळीतील कार्यकर्त्यांनी लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सजग राहिले तरच पुढच्या पिढीचे स्वातंत्र्य अबाधित राहील. आयुर्विमा महामंडळाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक राजकिशोर नाईक, वरिष्ठ विपणन व्यवस्थापक सुजात रॉय, संघटनेचे क्षेत्रिय महासचिव डॉ. राजेंद्र वाघ यांचीही यावेळी समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन टी. डी. काकडे यांनी केले. उपस्थितांचे आभार संध्या पंडागळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवींद्र म्हस्के, साहेबराव वानखेडे, मोहंमद खालेद, सुखदेव बनसोडे, सोनल पगारे, दीपक कांबळे, गौतम भुईगळ, राजेश बोर्डे आदींनी परिश्रम घेतले.



अनुसूचित जाती, जमाती व बौद्ध आयुर्विमा कर्मचारी कल्याण संघटनेच्या वतीने 'न्यायपत्र' या स्मरणिकेचे प्रकाशन करताना 'उपरा'कार लक्ष्मण माने. सोबत स्मरणिकेचे संपादक भीमराव सरवदे, आयुर्विमा महामंडळाचे वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक राजकिशोर नाईक, वरिष्ठ विपणन व्यवस्थापक सुजात रॉय, संघटनेचे क्षेत्रिय महासचिव डॉ. राजेंद्र वाघ, अशोक कुशेर, टी. डी. काकडे, वेणू कार्तिक, साधना कुलकर्णी.

**तुम जिओ हजारों साल, साल के दिन हो पचास हजार**


शिवनाथ राठी

आनंद प्रत्येक क्षणाचा तुमच्या वाटेला यावा,
फुलासारखा सुगंध नेहमी तुमच्या जीवनात दरवळावा !
सुख तुम्हाला मिळावे, दुःख तुमच्यापासून कोसभर दूर जावे !
हास्याचा गुलकंद तुमच्या जीवनात रहावा
आणि प्रत्येक क्षण तुमच्यासाठी आनंदाचाच यावा...!

मराठवाड्यातील प्रख्यात समाजसेवक, सर्व समाजबांधवांचे स्नेही, सायंदैनिक संजयवार्ताचे संपादक, खडकेश्वर मंदिराचे ट्रस्टी, अपंगांसाठी कार्य करणाऱ्या प्रेरणा ट्रस्ट या संस्थेचे विश्वस्त, सरकारी सिटी क्लबचे संचालक, माहेश्वरी समाजाचे समाजभूषण, सर्वांचे आवडते लोकप्रिय कार्यकर्ते

**शिवनाथ राठी यांना वाढदिवसाच्या लाख-लाख शुभेच्छा !**



दि. २८ नोव्हेंबर रोजी राठी यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटपाचा तसेच घाटी दवाखान्यात रुग्णांना फळेवाटप कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

सौजन्य : शिवनाथ राठी मित्रमंडळ, औरंगाबाद, मो. ९३२६०९७१११, ८८८८५४४४८१

सायंदैनिक संजयवार्ताचे संपादक वाढदिवसानिमित्त संजयवार्ता कार्यालयात सकाळी ९ ते १२ व ४ ते ६ या वेळेत इष्टमित्रांना भेटतील.